पुण्यनगरी पू. पान क्र. 1

दि. 19/04/2023

# नायगाव रेल्वे स्थानकलगत वाहनतळात दुचाकींना आग

## १५ दुचाकी जळून खाक

**नालासोपारा :** नायगाव पश्चिमेकडील रेल्वे स्थानकालगत असलेल्या वाहनतळात उभ्या असलेल्या दुचाकींना भीषण आग लागल्याची घटना सोमवारी रात्री ११ च्या सुमारास घडली. या आगीत १५ ते १६ दुचाकी जळून खाक झाल्याचा अंदाज आहे. आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याचे कारण अजून समजू शकले नाही.

नायगाव पश्चिमेच्या भागात रेल्वे स्थानकाला लागून व नायगाव उड्डाणपुलाखाली वाहने पार्क करण्यात आली होती. रात्री ११च्या सुमारास अचानक वाहनतळात उभ्या असलेल्या वाहनांनी पेट घेतला. एका जवळ एक वाहन उभे असल्याने आगीची तीव्रता अधिक वाढली.



या घटनेची माहिती नागरिकांनी वसई-विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान व पोलिसांना दिली. त्यानुसार अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचे कार्य सुरू केले.

### वाहनांचा पंचनामा सुरू


» या वाहनतळामध्ये शेकडो गाड्या उभ्या होत्या, मात्र नायगावमधील स्थानिक नागरिकांनी तातडीने त्या गाड्या बाजूला केल्याने मोठी वित्तहानी टळली.

» आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याचे कारण अजून समजू शकले नाही. घटनास्थळी माणिकपूर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी जळून खाक झालेल्या वाहनांचा पंचनामा सुरू केला आहे.

# आरोपींना व्हीआयपी वागणूक दिल्याप्रकरणी ५ पोलिसांचे निलंबन

## मीरा रोड रेल्वे स्टेशनबाहेरील प्रकार

**नालासोपारा : मीरा रोड :** मीरा रोड रेल्वे स्थानकाबाहेर मीरा-भाईंदर परिवहन सेवेच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपीला अटक करून मीरा रोड पोलीस ठाण्यात लॉकअपमध्ये न ठेवता त्यांना मीरा रोड पोलीस ठाण्याच्या अधिकारी कक्षात ठेवण्यात आले होते. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक व नयानगर पोलीस ठाण्याचे चार कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.



मीरा रोड रेल्वे स्थानकाबाहेर भाईंदर परिवहन सेवा, बेस्ट व ठाणे परिवहन सेवेचे बसस्थानक आहे. येथून ठाणे, मुंबई व मीरा रोड परिसरात बस सोडल्या जातात. याच चौकात टॉप-१० मोबाईल दुकान आहे. त्याचे मालक अनिल छेडा याने ११ फेब्रुवारी २०२३ रोजी कार चौकात उभी केली होती.

### सीसीटीव्हीत अधिकारी कक्षात ठेवल्याचे आढळले

या कारमुळे बस वळवता येत नव्हती. त्यामुळे बसचालकाने छेडा याची गाडी पुढे घेण्यास सांगितले. त्यावरून दुकानाचे मालक व त्याचा साथीदार या दोघांनी मिळून परिवहन कर्मचाऱ्याला मारहाण केली. मारहाण केल्याप्रकरणी टॉप-१० मोबाईल दुकानाचा मालक अनिल छेडा व त्याचा साथीदार कमलेश मिश्रा यांच्याविरोधात नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती.

नयानगर पोलीस ठाण्यात लॉकअप नसल्याने त्यांना मीरा रोड पोलीस ठाण्यात लॉकअपमध्ये आणले होते. अटक केल्यानंतर त्या दोघांना लॉकअपमध्ये न ठेवता पहिल्या मजल्यावर असलेल्या अधिकारी कक्षात ठेवण्यात आले होते. त्यावरून तक्रार केल्यानंतर सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सीसीटीव्ही फुटेजमध्ये त्यांना अधिकारी कक्षात ठेवल्याचे आढळले. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक मिलिंद बोरसे व लॉकअप गार्ड असलेले नयानगर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी रामेश्वर तारडे, बाबुराव गरुड, विजेंद्र दिवेकर, कैलास ठोसर अशा पाच जणांना निलंबित करण्यात आले.

# काँग्रेसचे जयभारत सत्याग्रह आंदोलन; भाईंदरमध्ये भाजपविरोधात नाराजी

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर येथे काँग्रेसतर्फे भाजपच्या धोरणांविरोधात जयभारत सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यावेळी घोषणा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर देण्याची मागणी करत भाईंदर येथील अप्पर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाजप सरकारच्या ९ वर्षांच्या राजवटीत चुकीच्या धोरणांमुळे देश अधोगतीला गेला आहे. काँग्रेसने देश घडवला व मोठा केला, परंतु आज देश एका उद्योगपतीच्या इशाऱ्यावर चालवला जात आहे, हे दुर्दैव आहे, अशी




टीका माजी आ. मुझफ्फर हुसेन यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले, राहुल गांधींनी भारत जोडोच्या माध्यमातून देशवासीयांना डरो मतचा संदेश दिला. जे प्रश्न संसदेत विचारले, तेच प्रश्न सर्वसामान्य नागरिक रस्त्यावर उतरून विचारत आहेत. परंतु मोदीजी हे उद्योगपतीबद्दल काहीही बोलण्यास तयार नाहीत. याचा अर्थ देशाची वाईट दिशेने वाटचाल सुरू आहे. राहुल गांधी यांचे संसद सदस्यत्व तडकाफडकी रद्द केले. ही लोकशाही नसून हुकूमशाही आहे. आरक्षण हटवून मनुवादाला प्रोत्साहन देत समान नागरी कायदा आणण्याचा डाव आखला जात असल्याची टीकाही आ. हुसेन यांनी केली.

जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीवर जीएसटी लावून महागाई वाढवली, बेरोजगारी वाढल्याने युवक नाराज झाले असून, महिला असुरक्षित असल्याने देशाची जनता रस्त्यावर उतरून या सरकारविरोधात उठाव करेल, असे प्रदेश सचिव आनंद सिंह यांनी सांगितले.

### मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष

देशाची घटना धोक्यात आली असून, धर्मवाद, जातीवाद, प्रांतवाद असे मुद्दे पुढे करून वातावरण कलुषित करीत मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे जिल्हा प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी सांगितले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, नगरसेवक राजीव मेहरा, गीता परदेशी, अनिल सावंत, रुबिना शेख, दिनेश सक्सेना, श्याम शहारे, सिद्धेश राणे, राकेश राजपुरोहित, महेंद्र सिंह, कुणाल काटकर, साहेबलाल यादव, जिल्हा पदाधिकारी, ब्लॉक, सेलचे अध्यक्ष, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

Scanned with CamScanner

दि. 19/04/2023

म.टा.पु. पान क्र.1



## चोरीचा माल पुन्हा मालकांकडे

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

भाईंदरच्या नवघर परिसरात घडलेल्या दुचाकीचोरी, मोबाइलचोरी तसेच रोख रकमेच्या चोरीच्या विविध प्रकरणांतील १६ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी तपास करत हस्तगत केला होता. हा मुद्देमाल नुकताच पोलिस उपायुक्तांच्या उपस्थितीत फर्यादींना परत करण्यात आला आहे.

नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत मागील काही महिन्यांत दुचाकीचोरी, मोबाइलचोरी व रोख रकमेच्या चोरीच्या अनेक घटना घडल्या होत्या. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर प्राप्त माहितीआधारे तपास सुरू करण्यात आला होता. यातील अनेक प्रकरणांत चोरट्यांना अटक करत पोलिसांनी तीन लाख ९० हजार रुपये किमतीचे ४१ मोबाइल फोन, दोन लाख ४२ हजारांच्या सहा दुचाकी व १० लाखांची रोकड जप्त केली होती. हा मुद्देमाल पोलिस उपायुक्त जयंत बजबळे यांच्या हस्ते फर्यादींना नुकताच परत करण्यात आला आहे. यावेळी उत्कृष्टरित्या तपास करत, मुद्देमाल परत मिळवून दिल्याबद्दल फिर्यादींनी पोलिसांचे आभार मानले.

लोकसत्ता पु. पान क्र. 1

## तरणतलावात बुडालेल्या मुलाचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** कळंब येथील एका रिसॉर्टच्या तरणतलावात बुडून पाच वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अर्नाळा सागरी पोलिसांनी याप्रकरणी अपमृत्यूची नोंद केली आहे. ठाण्याच्या माजिवडा येथे राहणारा गोविंदसिंग कथायत हे कुटुंबासह ७ एप्रिल रोजी कळंब येथील शीतल समुद्र मिनी गोवा येथील रिसॉर्टमध्ये फिरण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांचा पाच वर्षांचा मुलगा चैतन्य तरणतलावत बुडाला. त्याला उपचारासाठी ठाण्यातील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तो उपचारादरम्यान मरण पावला. याबाबतचा अहवाल मंगळवारी अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी तपास सुरू असून त्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती अर्नाळा सागरी पोलिसांनी दिली.

## खारघर दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भाईंदरमधील कार्यक्रम रद्द

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** नुकत्याच खारघर येथे झालेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात उष्माघाताने मृत्यू पावलेल्या श्री सदस्यांच्या दुर्घटनेचा धडा घेऊन मीरा-भाईंदर शहरातील अनेक सामाजिक कार्यक्रम रद्द करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांत राज्यातील तापमानात लक्षणीय वाढ होत आहे. त्यात तीन दिवसापूर्वीच खारघर येथे अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यासाठी आयोजित कार्यक्रमात उष्माघाताने १४ जणांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर शहरात आगामी दिवसात होणारे सामाजिक कार्यक्रम रद्द झाल्याची बाब समोर आली आहे.

यात २३ एप्रिल रोजी सद्गुरू नरेंद्र महाराजांच्या अनुयायांकडून मीरा रोड येथे रक्तदान शिबीर आणिइतर सामाजिक कार्यक्रम घेण्यात येणार होते.परंतु वाढत्या तापमानामुळे हा कार्यक्रम आता रद्द करण्याचा निर्णय आयोजकांनी केला आहे.

लोकसत्ता पु. पान क्र.4

## सोनसाखळी चोर केवळ देहबोलीवरून जेरबंद

### २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासले

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** रेल्वे प्रवाशांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या एका चोराला वसई रेल्वे पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. हा आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून ओळख पटू नये, यासाठी मुखपट्टी आणि टोपी घालत होता. मात्र, पोलिसांनी दोनशेहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतील चित्रीकरण तपासून त्याला त्याच्या देहबोलीवरून अटक केली आहे.

वसई रोड रेल्वेच्या हद्दीतील प्रवाशांच्या गळ्यातील सोनसाखळी आणि मंगळसूत्र चोरीच्या घटना वाढल्याने प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती. वसई रोड रेल्वे पोलिसांनी यातील एका प्रकरणाचा तपास करताना सीसीटीव्ही कॅमेरे तपासले होते. त्यावेळी संशयित व्यक्ती दिसला, पण त्याने ओळख पटू नये, यासाठी चेहऱ्यावर मुखपट्टी तसेच टोपी घातली होती. प्रत्येक गुन्ह्यांत तो टी-शर्ट, मुखपट्टी आणि टोपी घालून वापरत होता. त्यामुळे त्याला पकडणे पोलिसांपुढे एक आव्हानच होते. परंतु, पोलिसांनी दोनशेहून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासून त्याच्या देहबोलीचे निरीक्षण केले आणि नालासोपारा येथे सलग तीन दिवस सापळा लावला. त्यावेळी मोहम्मद अमन हुसेन (३०) याला अटक केली. त्याने वसई रोडमधील दोन व बोरीवली रेल्वे पोलिसांच्या हद्दीत केलेले सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्याच्याकडून चार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### रिक्षा व्यवसाय सोडून वळला चोरीकडे

आरोपीविरोधात यापूर्वी कुठल्याच गुन्ह्याची नोंद नाही, तो पूर्वी रिक्षा चालवत होता. नुकताच तो गावावरून नालासोपारा येथे राहण्यासाठी आला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन इंगवले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक एन.डी. पडवळ आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

Scanned with CamScanner

दि. 19/04/2023

लोकसत्ता पू. पान क्र. 1



# पश्चिम रेल्वेकडून घरे रिकामी करण्याच्या नोटिसा

## विरारच्या जीवदानी पाडामधील रहिवासी हवालदिल

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

वसई : विरार पूर्वेच्या जीवदानी पाडा रेल्वे लाइन येथील रेल्वे क्वॉरी परिसरात राहणाऱ्या हजारो नागरिकांना पश्चिम रेल्वेने घरे खाली करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. अचानक मिळालेल्या या नोटिसांमुळे रहिवासी हवालदिल झाले आहेत.

जीवदानी पाडा येथील रेल्वे लाइन या परिसरात ब्रिटिशकाळापासून नागरिकांच्या वसाहती आहेत. सध्या ३० हजारांहून अधिक लोक या परिसरात राहत आहेत. मंगळवारी अचानक येथील रहिवाशांना रेल्वेने घर खाली करण्याच्या नोटिसा दिल्या आहेत.

सात दिवसांच्या आत घरे खाली न केल्यास कारवाई केली जाईल असा इशारा या नोटिसीत देण्यात आला आहे. त्याच्या विरोधात मंगळवारी सकाळी जीवदानी पाडा, आंबेडकरनगर, इदगाव कंपाऊंड या परिसरातील हजारो नागरिक रस्त्यावर आले.

या नोटिसीमुळे येथील रहिवासी हवालदिल झाले आहेत. मंगळवारी या रहिवाशांनी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टी बचाव समितीच्या माध्यमातून स्थानिक आमदार हितेंद्र ठाकूर यांची भेट घेतली. आमदार ठाकूर यांनी याप्रकरणी तोडगा काढण्याचे आश्वासन रहिवाशांना दिले.

पुढारी पू. पान क्र. 1

# गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे वसईतील तुंगारेश्वर पर्वतावर

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

वसईतील तुंगारेश्वर येथील बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एका धार्मिक कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरूवारी (दि.२७ एप्रिल) वसईच्या तुंगारेश्वर पर्वतावर येणार आहेत. यासाठी आश्रम समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी आश्रम व्यवस्थापन समितीकडून जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, मंगळवारपासून (दि.२५) कार्यक्रमाला तुंगारेश्वर पर्वत येथे सुरूवात होणार आहे. तर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

बालयोगी श्री सदानंद महाराज यांच्या हस्ते मिती वैशाख शुद्ध पंचमी ते सप्तमी शके १९४५ मंगळवार दि. २५ ते २७ एप्रिल २०२३ दरम्यान श्री विष्णुयाग आणि श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली असून हा धार्मिक कार्यक्रम दरसाल आयोजित करण्यात येतो. या निमित्ताने मुख्यमंत्री तुंगारेश्वर येथील धार्मिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. यासाठी पोलिसांनी आतापासूनच बंदोबस्ताची आखणी सुरू केली आहे.

## धडकेत दुचाकीस्वार ठार

खानिवडे : १७ एप्रिलच्या रात्री आठ ते नऊ वाजता महामार्गावरील खानिवडे उड्डाणपुलाच्या मुंबई वाहिनीवर झालेल्या अपघातात एक दुचाकी चालक रस्त्यात पडून ठार झाला. तर दुचाकीचेही मोठे नुकसान झालेल्या अवस्थेत पडलेले होते. हा अपघात कोण्याअज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने झाल्यानंतर खाली पडलेल्या चालकाच्या अंगावरून वेगाने आलेली वाहने गेल्याने अशी अवस्था झाली असावी, असा अंदाज मदतकार्य करणाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत होता. या अपघात जीव गमावलेला चालक हिंद्र एल पाल (४५), जीवदानी रोड विरार येथील असल्याचे सांगण्यात आले. या अपघाताची नोंद मांडवी पोलिसांत करण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु. पान क्र.2

दि. 19/04/2023

# वाहने चोरणाऱ्या दोघांना अटक



## ५ गुन्ह्यांची उकल

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

रिक्षा व मोटर सायकल चोरी करणाऱ्या दोघांना तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक करुण ५ गुन्हे उघडकीस आले. चौकशीदरम्यान या आरोपीकडून ४ रिक्षा व मोटरसायकल असा एकूण ५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी याबाबत तपास केला असता त्या रिक्शाच्या चोरीबाबत तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. ती रिक्षा इसम शिशकुमार गुप्ता याच्याकडे असल्याचे निदर्शनास आल्याने तात्काळ गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी त्याच्याकडे तपास केला असता त्याने ही रिक्शा ही त्याचा मित्र प्रकाश त्रिवेदी याच्याकडुन घेतल्याचे सांगुन आणखी दोन चोरीच्या रिक्शा त्याने व त्याचा मित्र राकेश याने विरार येथील इसमांना विक्री केल्याची माहिती मिळाली. शिशकुमार गुप्ता यास ताब्यात घेवून तपास केला असता त्याचे साथीदार प्रकाश त्रिवेदी ऊर्फ मारवाडी याचा शोध घेवून त्यास मुंबई, अंधेरी येथून ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने व त्याचा साथीदार आरोपी शिवकुमार हरिहर गुप्ता व प्रकाश पोतराज त्रिवेदी, यांना गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांच्याकडुन तुळींजचे २ तर विरार पोलीस ठाण्याचे ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

पुढारी पु. पान क्र. ४

# मोबाईलवर बोलणाऱ्या ३६ वाहनचालकांवर कारवाई

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तलयाच्या हद्दीतील काशिमीरा वाहतूक शाखेने वाहन चालवताना मोबाईल फोनवर बोलणाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मोटार वाहन कायद्या प्रमाणे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड आकारून वाहतूक पोलिसांनी साडे तीन महिन्यात ३६ वाहनचालकांवर कारवाई करत त्यांच्याकडून ४७ हजार रुपये दंड वसूल केला आहे.

मिरा-भाईंदर शहरात वाहन चालकांमध्ये वाहन चालवताना मोबाईल फोनचा वापर करण्याचे प्रमाण वाढले असल्यामुळे प्रवाशांचा जीव देखील धोक्यात आला आहे. काशिमिरा वाहतूक शाखेने गेल्या साडे तीन महिन्यात वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणाऱ्यांवर कारवाई केलेला आकडा कमी असल्याचे दिसून येते. यावरून वाहतूक पोलीस याकडे कानाडोळा करत असल्याचे दिसत आहे. शहरात अनेक जण रिक्षातुन प्रवास करतात व रिक्षा चालवताना फोनचा वापर करणे धोकादायक आहे तरी देखील अनेक जण वाहतूक नियमांचे उल्लंघन करून बिनधास्त पणे फोनवर बोलत वाहन चालवताना दिसून येते. शहरात दररोज अनेक वाहन चालक मोबाईल फोनचा वापर करत असतात, त्यामुळे अनेकदा अपघात होऊन कित्येक जणांना जीव देखील गमवावा लागत आहे. तसेच चारचाकी वाहन चालक मोठ्या प्रमाणात आवाज करत हॉर्न वाजवणे व ध्वनी प्रदूषण करणाऱ्यावर देखील कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. १ जानेवारी २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ या आठ महिन्यात कलम मोटार वाहन कायद्या अंतर्गत कारवाई करत १८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला होता.

पुढारी पान क्र.3

# मुंबईच्या तरुणीचे अश्लील फोटो व्हायरल

## आसाम, वसईमधून दोघांना अटक



ठाणे : पुढारी डेस्क

इंस्टाग्रामवर फेक अकाऊंट तयार करून तरुणीचे मॉर्फ केलेले अश्लील फोटो व्हायरल करणाऱ्या दोघांना आसाम, वसई येथून अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई मुंबईच्या सांताक्रुझ पोलिसांनी केली असून आरोपींना मंगळवारी मुंबईत आणल्याची माहिती सांताक्रूझ पोलिसांनी दिली.

मुंबईत राहणाऱ्या २५ वर्षीय तरुणीचे फेक इंस्टाग्राम अकाऊंट तयार करून त्यावर तिचा अश्लील फोटो पोस्ट करण्यात आला होता. याबाबत समजताच तरुणीने फेक अकाऊंट तयार करणाऱ्याशी चॅट केले. तरुणीने मॉर्फ केलेले फोटो मागितला असता तिच्याकडे पैशांची मागणी करण्यात आली. बदनामी टळण्यासाठी तरुणी पैसे देण्यास तयार झाली. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी आरोपीने गुगल पे क्रमांक तरुणीला पाठवला. तरुणीने प्रसंगावधान राखत सातांक्रुझ पोलीस ठाण्यात तक्रार केली. या प्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला. सदर गुन्ह्याचा तांत्रिक माहितीच्या आधारे तपास केला असता आरोपी वसई-विरार परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार उपायुक्त अनिल पारसकर, एसीपी जयप्रकाश भोसले, वपोनि राजेंद्र काणे, पोनि अमर पाटील, पोनि ज्योती हिबारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि राहुल कोकाटे, अंमलदार गणेश चाबुकस्वार, गणेश हंचनाळे, प्रवीण सुरवसे, आकाश राणे यांनी वसई परिसरात सापळा लावून मुख्य आरोपी नंदलाल बडेला (२०) याला ताब्यात घेतले. बडेला याची कसून चौकशी केली असता तरुणीचे फेक अकाऊंट बनवणाऱ्या मित्राची माहिती त्याने पोलिसांना दिली. सदर माहितीच्या आधारे सातांक्रुझ पोलिसांनी आसाममध्ये जाऊन आरोपी अंकुर देब (१९) याला अटक केली.

Scanned with CamScanner

दि. 19/04/2023

सकाळ पृ. पान क्र. 2

# वसईतील मृतांच्या कुटुंबीयांचे जिल्हाधिकाऱ्यांकडून सांत्वन

## वसई तालुक्यातील चौघांचा मृत्यू; एकावर उपचार सुरू

नालासोपारा, ता. १८ (बातमीदार) : खारघर येथे पार पडलेल्या आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या महाराष्ट्रभूषण पुरस्कार सोहळ्यात वसई तालुक्यातील चार जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला आहे. या चार जणांपैकी स्वाती वैघ (वय ३४) या महिलेचा मंगळवारी (ता. १८) उपचारांदरम्यान मृत्यू झाला. एकाच तालुक्यातील चार जणांचा मृत्यू झाला असल्याने सर्वत्र दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

विरार पूर्व भामटपाडा येथील स्वप्नील किणी, वसईतील मीनाक्षी मोहन मिस्त्री, विरार पूर्व सुदाम पार्क, जीवदानी रोड येथील गुलाब बबन पाटील आणि विरार पूर्व चौधरी वाडी येथील स्वाती वैघ अशी मृत झालेल्या श्री सदस्यांची नावे आहेत; तर अंकुश घोडके यांच्यावर विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. स्वाती वैघ यांच्यावर वाशी येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांचे उपचारांदरम्यान निधन झाले.



**विरार :** पालघर जिल्हा दौऱ्यावर असलेल्या केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी मृत स्वप्नील किणी यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद घोडके, वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांनी सोमवारी (ता. १७) मृत स्वप्नील किणी यांच्या भामटपाडा येथील निवस्थानी जाऊन त्यांच्या नातेवाईकांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत देण्यात येणार असल्याचे सांगितले अंकुश घोडके हे विरारच्या संजीवनी रुग्णालयात उपचार घेत असल्याने त्यांच्या उपचाराचा खर्चही शासन करणार असून, हॉस्पिटल प्रशासनास तसे सांगण्यात आल्याची माहिती वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांनी सांगितले आहे.

लोकमत पृ. पान क्र. 3

# नवघर पोलिसांनी आठ वारांगनांवर केली कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या पूर्वेला बाळाराम पाटील मार्ग व रेल्वेस्थानक परिसरातील वारांगनांचा उपद्रव वाढल्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. अखेर नवघर पोलिसांनी आठ वारांगनांवर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या वारांगनांचा उपद्रव रोखण्यासाठी नेमलेले संयुक्त पथक कुचकामी ठरल्याची टीका होत आहे.

या परिसरात दिवस-रात्र वारांगनांचा राबता असतो. आंबटशौकीन तेथे सतत घुटमळत असतात. त्यामुळे सामान्य घरातील महिला व मुलींनाही मनस्ताप सहन करावा लागतो. मध्यंतरी खासदार राजन विचारे यांनी या प्रकरणी ठोस कारवाई व्हावी म्हणून बैठकीत रेल्वे पोलिस, नवघर पोलिस व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने मिळून संयुक्त कारवाई करण्याचे ठरले होते. मात्र, संयुक्त कारवाई होत नव्हती. नवघर पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर वरिष्ठ निरीक्षक विजय पवार यांनी याप्रकरणी कारवाई सुरू केली आहे. पोलिसांनी सापळा रचून बाळाराम पाटील मार्गावर वावरणाऱ्या लक्ष्मी सदा पवार, परविन जाहीद शेख, साहिना इस्माइल गाजी, राणी दिनेश गुरव, मंजू रामबिहारी प्रजापती, रोषेदा अमजात सोरदार, मिलन चिंतामण अपराज व इंदू संजय शर्मा यांच्यावर गुन्हा दाखल केला.

Scanned with CamScanner

दि. 19/04/2023

लोकमत पू. पान क्र. 5

# पोलिस ठाण्यांमध्ये सहायता कक्षच नसल्याने ताई, हिंमत कशी करणार?

धीरज परब
लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी, यासाठी मीरा भाईंदरमध्ये सहा पोलिस ठाण्यांत महिला सहायता कक्ष उभारण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, विविध पोलिस ठाण्यात पाहणी केली असता प्रत्यक्षात असे महिला सहायता कक्षच दिसले नाहीत. असे कक्ष उभारण्यास जागाही नाही. महिला अधिकारी व महिला पोलिसांची कमतरता पाहता महिला सहायता कक्ष चालवणे अवघड असल्याचे काही अधिकारीच खासगीत सांगतात. त्यामुळे ठाण्यात समस्या घेऊन येणाऱ्या काही महिलांना चांगले, तर काहींना वाईट अनुभव येत असतात.




**सन्मानाची वागणूक मिळावी म्हणून...**

**महिला सहायता कक्ष :** पोलिस ठाण्यात असा कक्षच दिसत नाही.

**दामिनी पथक :** रात्रीच्या वेळी महिलांना तत्काळ मदत मिळावी म्हणून मीरा भाईंदर शहरात रात्रीच्या वेळी १ दामिनी पथक कार्यरत आहे. त्यात एक महिला अधिकारी व अन्य ३ पोलिस अंमलदार असतात. महिलेने मदत मागितल्यास दामिनी पथक धावून जाते.

## महिला तक्रारदारांसाठी प्रत्येक ठाण्यात 'महिला सहायता कक्ष

पोलिस ठाण्यात येणाऱ्या महिलांना तत्काळ मदत मिळावी व तिचे म्हणणे ऐकून घेतले जावे म्हणून तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते यांनी प्रत्येक पोलिस ठाण्यात महिला सहायता कक्ष उभारण्यात आल्याचे नमूद केले होते. येणाऱ्या प्रत्येक महिलेचे म्हणणे ऐकून घेऊन तिला तत्काळ मदत केली जात असल्याचे माहिती पुस्तिकेत म्हटले होते, तर प्रत्यक्षात असे केंद्र मात्र दिसले नाही.

## महिला पोलिस बळ वाढवून मिळणार बळकटी

महिला पोलिस अधिकारी यांची कमतरता गृह खात्याने भरून काढणे आवश्यक आहे. तर महिला पोलिस कर्मचाऱ्यांची भरती सुरु असून, ती झाल्यावर महिला पोलिस उपलब्ध होणार असल्याने पोलिस ठाणेनिहाय सहायता उपक्रम राबविणे शक्य होईल.

## 'लोकमत'ने काय पाहिले?

महिला सहायता कक्ष नसल्याने येणाऱ्या महिलांना पुरुष ठाणे अंमलदार वा पुरुष अधिकारी यांना भेटून अडचण सांगावी लागते. त्यातही तक्रारीसाठी येणाऱ्या महिलांना त्यांचे म्हणणे समजून न घेता ताटकळत थांबवले जाते. तक्रार अर्ज घेण्यास अनेकवेळा टोलवाटोलवी केली जाते. मात्र, काही महिलांची पोलिसांनी विचारपूस करून त्यांची तक्रार घेऊन त्यांना मार्गदर्शन होत असल्याचेही किस्से आहेत.

पोलिस ठाण्यात महिला अधिकारी नियुक्त असून त्यांच्या स्तरावर महिला सहायता कक्ष सुरु आहे. भाईंदर पोलिस ठाणे परिसरात भरोसा सेल महिलांसाठी कार्यरत आहे.

- जयंत बजबळे, पोलिस उपायुक्त, मीरा-भाईंदर

Scanned with CamScanner

जागल्या

## तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकरणी पथकाची कामगिरी

# रिक्षा व मोटरसायकल चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक



**एकूण ४ रिक्षा व १ मोटरसायकल असे एकूण ५ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

विशेष प्रतिनिधी

वसई, दि. १८ : कुणीतरी बनावट नंबर प्लेटचा वापर करून रिक्षा चालवताना मिळून आल्याची माहिती विरार वाहतूक शाखेचे दक्ष पोलीस उपनिरीक्षक के. सूर्यवंशी यांनी तुळींज पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोहवा. मोरे यांच्याशी संपर्क साधून दिली होती. ह्या माहितीच्या अनुषंगाने तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस सतर्क झाले. रिक्षा चोरीबाबत तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असल्याचे त्यांना सांगण्यात आले. चोरीची रिक्षा शिशकुमार गुप्ता चालवत असल्याचे निदर्शनास आल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता ती चोरीची रिक्षा गुप्ताने त्याचा मित्र प्रकाश त्रिवेदी याच्याकडून घेतल्याचे सांगून आणखी दोन चोरीच्या रिक्षा त्रिवेदी व त्याचा मित्र राकेश यांनी विरार येथे विक्री केल्याची माहिती दिली. शिशकुमार गुप्ता याचा साथीदार प्रकाश त्रिवेदी उर्फ मारवाडी याचा शोध घेऊन त्याला मुंबई, अंधेरी येथून ताब्यात घेण्यात आले.

आरोपी शिशकुमार हरिहर गुप्ता रा. जीवदानी पाडा, विरार (पूर्व) आणि प्रकाश पोतराज त्रिवेदी रा. कुंभारपाडा, विरार (पूर्व) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी विरार हद्दीत व तुळींज हद्दीत आणखी ५ गुन्हे केल्याचे उघड झाले. त्यांच्याकडून एकूण ४ रिक्षा व १ मोटरसायकल असे एकूण ५ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. वरील कामगिरी परिमंडळ-२ च्या पोलीस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले- श्रृंगी, तुळींज विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा.पोलीस निरीक्षक मिथुन म्हात्रे, सहा.फौज. शिवानंद सुतनासे, पोहवा. आनंद मोरे, म्हाळू आव्हाड, दशरथ व्हावळे, उमेश वरठा, अश्फाक जमादार, पांडुरंग केंद्रे, पोअं. छपरिबन, राऊत तसेच विरार वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मधुकर सूर्यवंशी पोहवा संतोष चकोर, पोअं. योगेश भारुडे यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

# चोरीस गेलेले मोबाइल उपायुक्तांच्या हस्ते सुपूर्द

भाईंदर - नवघर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांतील १६ लाख ६० हजार रुपयांचा हस्तगत मुद्देमाल पीडित व फिर्यादी यांना पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१ यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला आहे. मुद्देमालामध्ये विविध कंपनीचे ४१ मोबाइल हँडसेट, ६ मोटरासायकल, १ ॲटो रिक्षा, रोख रकमेचा समावेश आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ हद्दीतील नवघर पोलीस ठाण्यामध्ये दाखल असलेल्या २०२२ व २०२३ मधील विविध गुन्ह्यांतील हस्तगत केलेला मुद्देमाल पोलीस उपआयुक्त जयंत वजबळे, परिमंडळ-१ यांच्या हस्ते पीडित व फिर्यादी यांना परत करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर तसेच चोरी व घरफोडीसारख्या गुन्ह्यांची पोलिसांनी कौशल्यपूर्वक उकल करत आरोपींकडून चोरून किंवा जबरीने नेलेल्या किमती वस्तु तसेच रोख रक्कम, मोबाइल हँडसेट इत्यादी गुन्ह्याचे तपासादरम्यान हस्तगत करण्यात आले आहेत.

Scanned with CamScanner

# महिलांकडून नायगाव पोलीस ठाण्याचे कौतुक

भाईंदर - नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिनाच्या दिवशी प्राप्त झालेल्या महिलांच्या अर्जाबाबत पोलिसांकडून समाधानकारक कार्यवाही करण्यात आल्याने महिलांनी नायगाव पोलीस ठाण्याचे कौतुक केले आहे. तक्रार निवारण दिवशी 'फक्त महिले'बाबत पाच अर्ज नायगाव पोलीस ठाण्यात प्राप्त झाले होते. त्यापैकी दोन अर्ज भरोसा सेलकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले व तीन अर्जातील अर्जदार यांचे समाधान करून अर्ज फाईल करण्यात आले असल्याची माहिती नायगाव पोलिसांनी दिली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यात नागरिकांचे तक्रार अर्ज प्राप्त होत असतात. नागरिकांकडून प्राप्त तक्रारीचे लवकरात लवकर निवारण होण्यासाठी व नागरिकांना न्याय मिळण्याकरिता वेगळी उपाय-योजना राबवत दर शनिवारी पहिल्या सत्रात तक्रार निवारण दिन साजरा करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी घेतला होता. याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

आठवड्यातील दर शनिवारी पोलीस ठाणे निहाय पहिल्या सत्रामध्ये नागरिकांचे अर्ज/तक्रारी असतील, तर त्याचे निवारण करण्यात येत आहे. यामुळे आजवर धूळ खात असलेले अथवा दुर्लक्ष्य करण्यात आलेल्या सर्व अर्जाचे निवारण होणार आहे. पोलीस आयुक्ताच्या निर्णयाला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांच्या तक्रारीचे लवकरात लवकर निवारण होणे हा तक्रार निवारण दिन साजरा करण्यामागचा एकमात्र उद्देश आहे.

Scanned with CamScanner

लोकमत

# नायजेरियनकडून गांजा जप्त

**नालासोपारा :** नालासोपाऱ्यात नायजेरियन नागरिकाकडून गांजा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. प्रगतीनगर परिसरातील एसवी अपार्टमेंटमध्ये सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास नायजेरियन आरोपी प्रिन्स ओकेझी ओकेफी (४५) याच्या ताब्यात ३ हजार १४० रुपये किमतीचा गांजा अमली पदार्थ व रोख असा ३ हजार ७४० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळून आला होता. तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 19, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner